# माझी अमेरिकावारी

3

नंदिनी देशमुख



# माझी अमेरिका वारी – भाग ३

नंदिनी नीळकंठ देशमुख

nandini.deshmukh@gmail.com

mob. 9004094617

ई साहित्य प्रतिष्ठान

# माझी अमेरिकावारी-3

(Majhi Amerikawari)


लेखिका:- नंदिनी देशमुख

nandini.deshmukh@gmail.com

9004094617



प्रकाशक: ई-साहित्य प्रतिष्ठान

वेब: www.esahity.com

ईमेल esahity@gmail.com

प्रकाशन : 2 September 2016



©esahity Pratishthan®2016

- या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण किंवा रुपांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

# मनोगत



भारतामधून जे कुणी वयस्कर लोक अमेरिकेत जातात त्यातील नव्वद टक्के लोक आपल्या मुलीच्या किंवा सुनेच्या बाळंतपणासाठी जातात. अमेरिकेतील लोकांना याचे आश्चर्य वाटते. त्यांच्या दृष्टीने लग्न, बाळंतपण या गोष्टींसाठी आईवडिलांनी यायची काय गरज? हाच तर आपल्या आणि त्यांच्या संस्कृतीमधला फरक आहे ना? सुख दु:खामध्ये आपल्या जवळच्या लोकांना सामील करून घेणे ही आपली संस्कृती.

माझी सगळयात लहान मुलगी रश्मी, हिच्या बाळंतपणाच्या निमित्ताने मलाही असाच अमेरिकेला जाण्याचा योग आला. केवढे अप्रूप या गोष्टीचे. माझ्या प्रवासाच्या आठवणी मी लिहून ठेवल्या. ही गोष्ट डिसेंबर २००८ मधील. त्यालाही आता सात आठ वर्ष झाली. मी आल्यानंतर बरेच लोक कुतूहलाने मला अनेक प्रश्न विचारीत. तेथील माहिती विचारीत. तसेच कुणाला जायचे असेल तर मला त्यांचे फोन येत किंवा कुणी प्रत्यक्ष भेटून त्यांच्या मनातील शंका कुशंका विचारीत. (जशा मी पण काही लोकांना जायच्या आधी विचारल्या होत्या. ) त्यामुळे आपल्या अनुभवामध्ये इतरानाही सहभागी करून घ्यावे असे वाटले. तेव्हाच्या पेक्षा आता अमेरिकेला जाण्याचे प्रमाण वाढले आहे. पर्यटन करण्यासाठी सुध्दा आता लोक सहज युरोप, अमेरिकेची ट्रीप करतात.

त्यावेळी तसे नव्हते. शिवाय या सात आठ वर्षामध्ये आपल्याकडेही मॉल संस्कृती, इन्टरनेट, टी. व्ही., मोबाईल मुळे रोजच्या व्यवहारामध्ये खूप फरक पडला आहे. त्यात नाविन्य असे काही राहिले नाही. त्यामुळे मी लिहिलेल्या आठवणीतील बऱ्याचशा गोष्टी मला त्या वेळी जरी नवीन वाटल्या तरी आता काही त्या तशा वाटणार नाहीत. शिवाय मी नांदेडसारख्या एका छोट्या जिल्ह्याच्या ठिकाणाहून एकदम अमेरिकेला गेले, त्यामुळेही कदाचित हा फरक मला जास्त जाणवला असावा.

ह्या 'अमेरिका वारी' प्रवास वर्णनाचे मी एकंदर तीन भाग केले. पहिला भाग म्हणजे जाण्याचे ठरले तेव्हापासून विमानात बसेपर्यंत. सुरवातीला तयारी करतानाचे अनुभव, पासपोर्ट, व्हिसा, चार-पाच महिन्यासाठी जायचे म्हणजे इथली सगळी तयारी, शारीरिक, मानसिक आणि आर्थिक, हा सगळा अनुभव पहिल्या भागात आला आहे. दुसऱ्या भागात तेथील रोजचे घरातील दैनंदिन जीवन. तिकडील बाळंतपणाचे आपल्याकडील लोकांना खूप कुतूहल असते. तसेच रोजचे जीवन कसे असते याचीही उत्सुकता असते. ते सगळे सविस्तर वर्णन दुसऱ्या भागात केले आहे. आणि तिसऱ्या भागात आम्ही तिथे जवळपास कुठे कुठे फिरलो, काय काय बघितले त्याच्या आठवणी.

आठवणी लिहिताना त्या सरळ सरळ लिहिल्या होत्या. प्रसिध्द करतांना त्या बऱ्याच व्यवस्थित संकलित कराव्या लागल्या. मुख्य म्हणजे आधी रश्मीला सगळे वाचायला दिले आणि तिची संमती मिळाल्यावर नीलम आणि नमिता या दोघींना पण वाचून त्यांचे मत विचारले. सगळयांच्या विचाराने शेवटची प्रत तयार केली. आगामी पुस्तकांच्या यादीत सुनील सामंत यांनी बऱ्याच दिवसांपूर्वी या पुस्तकाची घोषणा केली, पण या सगळया गोष्टींमुळे

थोडा उशीर झाला. त्याबद्दल मी ई-साहित्यची दिलगीर आहे. पण आपल्या अनुभवामध्ये इतरांना सामील करून घेणे हा आनंद एक वेगळेच समाधान देवून जातो.

माझ्या तीनही मुली आणि जावई, नीलम-गिरीष, नमिता-निखील, आणि मुख्य रश्मी-सारंग ज्यांच्यामुळे मला अमेरिकेला जाण्याचा योग आला, हे सर्व माझ्या आयुष्याचे अविभाज्य घटक आहेत, त्यामुळे त्यांचे आभार मानणे म्हणजे मी माझे स्वतःचे आभार मानण्यासारखे आहे. तरीपण अशा मुली आणि असे जावई मला मिळाले हे मी माझे नशीब आणि त्याबद्दल परमेश्वराचे आभार मात्र नक्कीच मानते. या प्रवासाला जाण्यासाठी माझे नातेवाईक, मित्र-मैत्रिणी, कार्यालयीन सहकारी यांचे सहकार्य मला मिळाले, त्यांचीही मी आभारी आहे.

सुनील सामंत यांनीही त्यांच्या व्यापातून वेळ काढून बराच पत्रव्यवहार केला, आणि ई-साहित्यने हे माझे पुस्तक प्रकाशित केले त्याबद्दल मी त्यांची आभारी आहे.

धन्यवाद.

नंदिनी देशमुख

अर्पण पत्रिका

माझ्या मुली, जावई आणि नाती

नीलम-गिरीष

नमिता-निखील

रश्मी-सारंग

आणि

अमेया, राधिका, विभा, मिहिका आणि श्रुती

यांना, त्यांनी माझ्या जीवनात भरभरुन दिलेल्या आनंदाप्रित्त्यर्थ.....

या पुर्वीचे भाग वाचण्यासाठी

माझी अमेरिकावारी भाग १

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/majhi_amerikawari_nandini_deshmukh.pdf

माझी अमेरिकावारी -२: (प्रवास) : नंदिनी देशमुख

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/majhi_amerikawari_2_nandini_deshmukh.pdf

# माझी अमेरिकावारी भाग ३

सॅनहोजे येथे मिलीपीटास या ठिकाणी साहित्य संमेलन होते. या सॅनहोजेची पण एक गम्मत झाली. त्याचे स्पेलिंग 'SANJOSE' असे आहे . मी ते वाचताना नेहमी 'सॅनजोसे' अशीच वाचायची. पण त्याचा उच्चार 'सॅनहोजे' असा करायचा असतो ते माझ्या लक्षात राहायचे नाही. मी बरेचदा सॅनजोसे म्हणायची. मग रश्मी आणि सारंग मला चिडवीत असत. सारंग रोज सकाळी आठ वाजता मला तिथे नेवून सोडायचा. पहिले दिवशी तर तो सर्व काही व्यवस्थित होवून मी आत हॉलमध्ये गेल्यावर वापस गेला. रात्री कार्यक्रम संपल्यावर मी त्याला फोन करायची. मग तो मला घ्यायला यायचा. तिथे सगळे मराठी बोलणारे लोक असल्यामुळे मला छान वाटत होते. साहित्य संमेलन छान झाले. ते पहिले मराठी विश्व साहित्य संमेलन होते. तिथल्या मराठी लोकांनी वेळात वेळ काढून सगळी तयारी केली होती. लोकांनी अमाप उत्साह दाखवला. त्यांना आपल्या देशाचा अभिमान वाटत होता. आपल्याला जसे वाटते की लोकांनी आपल्या घरी यावे, आपण त्यांची बडदास्त ठेवावी, त्यांच्या सहवासात आपण काही क्षण घालवावे, विचारांची देवाणघेवाण करावी. तीच वृत्ती दिसत होती. एवढे सगळे एकत्र जमण्याचे साहित्य संमेलन हे प्रयोजन त्यांना मिळाले. असा योग जुळून येण्यासाठी त्यांना बरेच कष्ट करावे लागले.

गंगाधर पानतावणे हे संमेलनाचे अध्यक्ष होते. बरीच प्रसिध्द, नावाजलेली मंडळी आली होती. अश्विनी भावे आणि सुधीर गाडगीळ यांनी कार्यक्रमाचे संचलन केले.

चौदा फेब्रुवारीला मोठ्या दिमाखाने दिंडी निघाली. भारतापासून खूप दूर, सात समुद्रापलीकडे असलेल्या एका देशात वातावरण महाराष्ट्रमय झाले होते. महाराष्ट्रीयन वेशातील स्त्री, पुरुष आणि मुले बघून डोळयांचे पारणे फिटले. त्यावर कळस म्हणजे तिथल्या मराठी लोकांनी ‘आम्ही मराठी’ हा बहारदार कार्यक्रम सादर केला. आपले सण, त्या सणाचे प्रसंग, त्यातील बारकावे, त्याचे महत्व नृत्य आणि गायनातून सादर करून लोकांची वाहवा मिळवली. त्या कार्यक्रमाच्या संयोजिका माधवी मुटाटकर होत्या.

त्यानंतर उदघाटनाची भाषणे झाली. दुपारच्या सत्रात मधुवंती भिडे यांनी सुरेश भटांची गीते, ‘अंतरंग’ या कार्यक्रमात सादर केली. जागतिकीकरण, मराठी भाषेचे आव्हान या विषयावर परिसंवाद झाला. रा. रं. बोराडे, वामन होवाळ आणि द. मा. मिरासदार यांच्या कथाकथनाने कार्यक्रमाची रंगत वाढतच गेली. त्या दिवशीच्या कार्यक्रमाचा कळस म्हणजे संध्याकाळी सादर झालेला ‘खेळ मांडीयेला’ हा कार्यक्रम. बेल्जियम येथून आलेल्या ‘ज्युडी रस्ट’ या महिलेने सादर केलेला भक्तिगीतांचा कार्यक्रम. ज्ञानेश्वर महाराज, तुकाराम महाराज यांचे अभंग तिने तिच्या मराठी उच्चारांप्रमाणे आणि तिच्या लयीत म्हंटले. पण त्यामुळे त्या अभंगाचे महत्व कमी तर झालेच नाही उलट आपल्या भाषेचा झेंडा खऱ्या अर्थाने साता समुद्रापार फडकल्याचा आनंद सर्वांच्या चेहऱ्यावर दिसत होता. त्या दिवशी रात्री पं. हृदयनाथ मंगेशकर यांच्या गाण्याचा कार्यक्रम झाला. खुसखुशीत शैलीत स्वतःच कार्यक्रमाचे निवेदन करून त्यांनी श्रोत्यांची मने जिंकून घेतली. सर्वजण कार्यक्रमात रंगून गेले होते. रात्री तीन वाजेपर्यंत हा कार्यक्रम चालला.

दुसरे दिवशी कार्यक्रमाची सुरवात एका परिसंवादाने झाली. परिसंवादाचा विषय होता, ‘समकालीन मराठी साहित्य – नव्या वाटा’ . परिसंवाद अतिशय रंगला. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, रामनाथ चव्हाण, विलास गीते, डॉ. प्रमोद मुनघाटे, उषा तांबे, अपर्णा वेलणकर आणि सम्राट फडणीस यांनी आपले विचार व्यक्त केले. अपर्णा वेलणकर हिचे भाषण खूपच प्रभावी झाले. त्यापाठोपाठ ‘आजची मनोरंजनाची माध्यमे आणि अभिरुची’

या विषयावर परिसंवाद झाला. त्यात वि. भा. देशपांडे, मीना गोखले, अजित दळवी, अरुण प्रभुणे, अश्विनी भावे, प्रकाश खांदगे आणि विद्या देवधर यांनी आपले विचार मांडले.

सुप्रिया पुराणिक यांनी 'नवरस नृत्याविष्कार' हा कार्यक्रम सादर केला. आपल्या नृत्यामधून आणि अभिनयातून त्यांनी नऊ रसांचे अविष्कार प्रकट केले. अमेरिकेत जावून भरत नाट्यम आणि कथ्थक बघतांना आपण आपल्या देशापासून फार कुठेतरी, कितीतरी योजने दूर आहोत अशी भावना मनाला स्पर्शही करत नव्हती. दुपारी चार वाजता प्रशांत दामले यांची मुलाखत सुधीर गाडगीळ यांनी घेतली. प्रश्न विचारणारे सुधीर गाडगीळ आणि उत्तरे देणारे प्रशांत दामले, मग मुलाखत न रंगेल तरच नवल. सुधीर गाडगीळ यांनी आपल्या मिश्कील शैलीत प्रश्न विचारले आणि प्रशांत दामले यांनी आपल्या खुसखुशीत शैलीत त्यांना उत्तरे दिली.

त्यानंतर काव्य वाचनाचा कार्यक्रम झाला. शंकर वैद्य यांनी कार्यक्रमाचे संचलन केले. प्रवीण दवणे, अरुणा ढेरे, शंकर वैद्य, इंद्रजीत भालेराव, श्रीधर नांदेडकर, प्रकाश होळकर, सुधाकर गायधनी यांच्या कवितांनी श्रोत्यांची मने जिंकून घेतली. काव्य वाचनानंतर संजय पाचपांडे यांनी दिग्दर्शित केलेला बहिणाबाईंच्या जीवनावर आधारित 'माह्ये मनगत' हा सांगितिक कार्यक्रम खूप काही सांगून गेला. गाण्याबरोबरच बहिणाबाईंच्या जीवनातील प्रसंग नाट्य रूपाने प्रेक्षकांसमोर उभे केले गेले . कार्यक्रम खूपच लांबल्यामुळे त्या दिवशी होणारा 'संत साहित्य आणि व्यवस्थापन शास्त्र' हा संवाद दुसरे दिवशी सकाळी घेण्याचे जाहीर केले गेले. त्या दिवशी रात्री भरत जाधव, अंकुश चौधरी आणि केदार शिंदे यांचा 'हसा चकट फू' हा कार्यक्रम झाला. हा कार्यक्रम म्हणजे आत्तापर्यंत झालेल्या सगळया कार्यक्रमांमध्ये सर्वात जास्त आवडता कार्यक्रम ठरला. संपूर्ण हॉल लोकांनी खचाखच भरला होता आणि हसून हसून लोकांची पुरेवाट होत होती. रात्री दीड वाजेपर्यंत हा कार्यक्रम चालला.

सोळा फेब्रुवारीला शेवटच्या दिवशी सकाळी 'संत साहित्य आणि व्यवस्थापन शास्त्र' हा परिसंवाद झाला. त्यात रामचंद्र देखणे, माधवी वैद्य, भालचंद्र शिंदे, विनिता महाजनी, दादा गोरे, मिलिंद जोशी, मधु नेने यांचा सहभाग होता. त्यानंतर 'दिवाळी अंक' या विषयावर परिसंवाद झाला. एवढा चांगला विषय, तोही साहित्याशी निगडीत असूनही वेळेअभावी तो लवकर गुंडाळण्यात आला.

अविनाश धर्माधिकारी यांचे भाषण लोकांच्या मनाची पकड घेवून गेले तर सिंधुताई सपकाळ यांच्या मनोगताने लोकांची मने हेलावून गेली. प्रवीण दवणे यांची मुलाखत सुनील चव्हाण यांनी घेतली.

त्यानंतर सत्कार समारंभ आणि बक्षीस समारंभ झाला. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी होते महाराष्ट्राचे सांस्कृतिक मंत्री हर्षवर्धन पाटील. पाटील साहेबांनी स्वतः मंचावर डॉ. गंगाधर पानतावणे, कौतिकराव ठाले आणि संदीप देवकुळे यांना सराईतपणे फेटे बांधून बहार उडवून दिली आणि तेथील सर्वच लोकांमध्ये एक आपुलकीची भावना निर्माण केली .

अश्विनी भावे यांनी संचलन केलेला सारेगम हा कार्यक्रम झाला. त्यानंतर तेथील लहान मुलांनी मनाचे श्लोक सादर केले.

त्या दिवशी रात्री सादर झालेला कार्यक्रम म्हणजे सलील कुलकर्णी आणि संदीप खरे यांचा 'शब्द सुरांच्या गाठी' हा कार्यक्रम. संदीप खरे यांच्या कविता आणि दोघांनी सादर केलेली गाणी कार्यक्रमाची लज्जत वाढवतच होती.

पहिल्या मराठी विश्व साहित्य संमेलनाचे तीन दिवस कसे गेले ते कळलेच नाही. सारंग रोज सकाळी आठ वाजता मला तिथे नेवून सोडायचा आणि रात्री कार्यक्रम संपल्यावर मी फोन केला की मला घ्यायला यायचा. नांदेडहून सौ. शारदा तुंगार, शंतनु डोईफोडे आणि अच्युत बन हे तिघे आले होते. नांदेडच्या लोकांना बघून मला खूपच आनंद झाला. शंतनु तर अगदी घराजवळच राहणारा. शारदा तुंगार यांनी लिहिलेल्या 'शांग्रीला' या पुस्तकाचे तिथे विमोचन झाले. खरे तर त्या तिघानाही मी घरी बोलवले होते. पण मी स्वतःच पूर्ण वेळ तिथे होते आणि त्या दरम्यान तिथे सतत पाऊसही चालू असायचा त्यामुळे

ते जमले नाही . शेवटचे दिवशी सलील कुलकर्णी आणि संदीप खरे यांच्या कार्यक्रमाला सारंग आला होता. तो त्या दिवशी मला नेण्यासाठी थोडा लवकर आला. त्यामुळे त्यालाही तो कार्यक्रम बघता आला. शेवटचा दिवस असल्यामुळे आणि उशिर होत असल्यामुळे बाहेरगावचे बरेच लोक लौकर वापस गेले होते. रश्मीला मात्र राधिका लहान असल्यामुळे एकाही कार्यक्रमाला हजर राहता आले नाही.

विश्व साहित्य संमेलनाचे तीनही दिवस सतत पाऊस पडत होता. वातावरण अतिशय प्रसन्न होते. चहा, नाश्ता, जेवणाची व्यवस्था अतिशय उत्तम होती. या साहित्य संमेलनासाठी संदीप देवकुळे आणि त्यांचे सहकारी यांनी अतिशय परिश्रम घेतले आणि ते यशस्वी करून दाखवले.

दरम्यान हेमाला मुलगी झाली. एक दिवस आम्ही त्यांच्याकडे जावून आलो. पाऊस सारखा सुरूच असायचा. पूर्ण आठवडाभर उन असायचे आणि शनिवार, रविवार पाऊस. आता राधिकाला दोन महिने पूर्ण झाले होते. रश्मीला वाटायचे, आई एवढ्या लांब आली आहे, इथे एवढे बघण्यासारखे आहे, लोक दुरून दुरून मुद्दाम बघायला येतात. आपण तिला काहीच दाखवले नाही. आईला सारखे घरातच काम करावे लागत आहे. सारंग आणि ती दोघे मिळून कुठे जायचे, केव्हा जायचे हे ठरवत बसायची.

दरम्यान माझ्या हातासाठी ज्या डॉक्टरांची अपॉइंटमेंट घेतली होती, त्यांच्याकडे जाण्याचा दिवस आला. मी सारंगला आधीच सांगितले होते, तू ज्यांची अपॉइंटमेंट घेणार आहेस ते इंडियन डॉक्टर असावेत. त्यांनी मला फक्त गोळया लिहून द्याव्यात, जेणेकरून त्या घेतल्या की माझे दुखणे थांबावे. त्यांनी जर दुसरे काही अवघड उपचार सांगितले तर ते मी करून घेणार नाही. माझ्या या अटी ऐकून ती दोघेही हसायची. तरी पण सारंगने एका इंडियन डॉक्टरांचीच अपॉइंटमेंट घेतली. ते शीख होते आणि अमेरीकेतच स्थायिक होते. त्या दिवशी सारंगने सुट्टी घेतली. डॉक्टराना बघून मला बरे वाटले. मुख्य म्हणजे ते माझ्याशी हिंदीत बोलले. मी त्यांना सांगितले की मी नांदेडहून आले आहे. नांदेडला नुकत्याच झालेल्या ३०० व्या गुरुनानक जयंतीच्या सुवर्ण महोत्सवाबद्दल मी त्यांना सांगू लागले. त्याबद्दल त्यांना विशेष माहिती नसावी असे वाटले तरी मी जे काय

सांगितले ते त्यांनी ऐकून घेतले. माझा हात बघून त्यांनी गोळ्या लिहून दिल्या. आणि जर त्याने बरे नाही वाटले तर इंजेक्शन घ्यावे लागेल असे सांगितले. मला तर गोळ्या घेवून नांदेडला येईपर्यंत कसे तरी दिवस काढायचे होते. तिकडे आपल्या इकडच्या सारखे डॉक्टर चिठ्ठी लिहून देत नाहीत. आपल्याला कोणते मेडिकल स्टोअर जवळ आहे आणि आपण नेहमी कोणत्या दुकानातून औषधे घेतो त्याप्रमाणे आपले प्रिस्क्रिप्शन डॉक्टर डायरेक्ट त्या मेडिकल स्टोअर मध्ये पाठवतात. नंतर तो मेडिकल स्टोअरवाला आपल्याला फोनवरून कळवतो आणि मग ती औषधे आपण घरी घेवून यायची. त्या मेडिकल स्टोअर मधून आपल्याला फोन येतो . त्यानंतर आपण तिथे जावून ते औषध घेवून यायचे . इकडे येईपर्यंत मी त्या गोळ्या घेत राहिले. (तरी माझा हात दुखायचा कमी झाला नाही. नांदेडला आल्यावर आमच्या नेहमीच्या डॉ. मांडाखळीकर कडे जावून गोळ्या घेतल्या आणि नंतर फ़िजिओ थेरेपीस्ट कडे जावून ट्रीटमेंट घेतली तेव्हा दहा दिवसात माझा हात दुखायचा थांबला.)

एका शनिवारी थोडे उन पडले होते, त्या शनिवारी सॅनफ्रान्सिस्कोला जायचे असे ठरवले. सकाळी दहा वाजता आम्ही घराच्या बाहेर पडलो. तिथे दहा म्हणजे अगदीच कोवळे उन. शिवाय राधिकाचे सगळे आवरून निघावे लागले. जाताना जेवणही बाहेरच एका मेक्सिकन हॉटेल मध्ये केले. बऱ्याचशा भाज्या घालून केलेला भाताचाच एक प्रकार होता तो.

मी पहिल्यांदा इथे आले होते तेव्हा घरी जाताना आम्ही याच रस्त्याने आलो होतो. पण त्यावेळी मी नवखी होते. थोडी भांबावून गेले होते. रश्मी आणि सारंग बऱ्याच दिवसांनी भेटले होते त्यामुळे आम्ही खूप बोलत होतो. आता यावेळी मात्र मी त्या प्रवासाचा पूर्ण आनंद घेतला. आजूबाजूला असलेल्या डोंगराच्या लांबच्या लांब रांगा, त्यावरील रेशमासारखी दिसणारी हिरवीगार हिरवळ, मोठमोठी झाडे, निरनिराळ्या रंगाची आकर्षक, मन मोहून टाकणारी फुले आणि त्या डोंगरावर असलेली छोटी, छोटी कौलारू घरे.

शहरात प्रवेश केल्यानंतरही तेच दृश्य. अतिशय आखीव, रेखीव आणि सुटसुटीत घरांचे शहर. पूर्णपणे टेकड्यांवर जाणारे रस्ते. एका टोकावर असाल तर सरळ खाली घसरगुंडीसारखा घसरत जाणारा रस्ता आणि समोरच पुन्हा वरच्या समोरच्या टेकडीवर टोकाशी भिडला जाणारा तोच रस्ता. चौकात असलो तर चारी बाजूनी असे टेकडीच्या टोकाला जाणारे सरळ रस्ते दिसायचे आणि आपण मध्यभागी एका खोलगट भागात आहोत असे वाटायचे. त्या चारही रस्त्यांवर मोठ्या दिमाखात उभी असलेली ती टुमदार दोन मजली घरे आपल्याकडे बघून मिस्कीलपणे हसत आहेत असे वाटायचे. प्रत्येक घर बघितले की आम्ही एकमेकांना म्हणत असू, ते बघ, ते बघ ते घर किती सुंदर आहे. प्रत्येक घरापुढे सजवलेला छोटासा बगीचा, निरनिराळे आकार दिलेली हिरवीगार सुंदर झाडे. या सर्वांची शोभा वाढवणारी रंगीत फुलांची झाडे . शिवाय प्रत्येक घराचे वेगळे जपलेले असे काही खास वैशिष्ट्य.

सॅनफ्रान्सिस्को येथे पाहण्यासारखे जगप्रसिध्द ठिकाण म्हणजे ‘गोल्डन गेट’. समुद्राच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत जाण्यासाठी बनवलेला एक लोखंडी पूल. त्या पुलावर मोठे मोठे तीन गेट आहेत. भरभक्कम लोखंडी साखळया, दुसऱ्या टोकाला व्ह्यू पॉइंट.



त्या भव्य पुलाला, त्याच्या गेटना संपूर्ण सोनेरी कलर दिलेला होता. हे गोल्डन गेट २७ मे १९३७ रोजी बांधून पूर्ण झाले. त्याची लांबी ८९८१ फूट एवढी आहे. जेव्हा तो बांधून पूर्ण झाला तेव्हा तो जगातील सर्वात लांब असा पूल होता. आताही अमेरिकन इन्स्टिट्यूट ऑफ अर्कीटिकटच्या मताप्रमाणे तो जगातील सर्व पुलांमध्ये पाचव्या क्रमांकावर आहे. त्याच्या एका बाजूला समुद्र तर दुसऱ्या बाजूला रस्ता आणि झाडे आहेत. पायी चालणाऱ्या लोकांसाठी खास व्यवस्था आहे. सकाळी पाच ते संध्याकाळी चार वाजेपर्यंत तिथे पायी चालण्याची परवानगी आहे. तिथून समुद्र बघण्यासाठी वेगवेगळे व्ह्यू पॉइंटस आहेत. कुठूनही समुद्राकडे बघितले की मन कसे अगदी शांत शांत होते. सगळा थकवा, सगळा शीण एका क्षणात नाहीसा होतो. राधिका तिच्या कारसीट मध्ये झोपूनच असायची. राधिकाला स्ट्रोलर मध्ये घालून आम्ही पण त्या पुलावर पायी फिरण्याचा आनंद घेतला.

गोल्डन गेट मधून बाहेर पडल्यानंतर जवळच तिथे एक गोल्डन गेटचे पार्क आहे. ते पार्क बघण्यासाठी आम्ही निघालो. परंतु पार्कला जाण्यासाठी जे एक्झिट असते ते चुकले आणि आम्ही पुढे गेलो. त्यामुळे आम्हाला बरेच कुठे कुठे फिरावे लागले. तिथे गाडी कुठूनही कुठे काढता येत नाही. रस्त्यावर जसे बाण दाखवलेले असतात त्याप्रमाणेच जावे लागते. आम्ही शहरात खूप फिरलो आणि आम्हाला सगळे शहरच बघायला मिळाले. शिवाय भर दुपारी फिरत असलो तरी पण हवेतला आल्हाददायकपणा यत्किंचीतही कमी झालेला नव्हता. त्यामुळे थकवा वाटत नव्हता. आम्ही साडे चार वाजता पार्क मध्ये पोंचलो. थोडी

संध्याकाळ होत आली होती. हवेत गारवा सुरु झाला होता. तिथे फुलांचे प्रदर्शन होते. अतिशय योजनाबध्द, गोल घुमटाकार अशी एक इमारत होती. त्यात निरनिराळे विभाग होते. ज्या झाडांना जसे हवामान आणि पाणी पाहिजे तशी योजना तिथे केलेली होती. त्याप्रमाणे ती झाडे वाढविण्यात आलेली होती. कितीही बघितले तरी समाधान होवू नये



अशी वेगवेगळया रंगांची, आकाराची फुले, आणि प्रत्येक गोष्टीकडे बघून, अहाहा ... ओह.. व्वा व्वा ... बाप रे कित्ती सुंदर असे उदगार निघायाचेच. तिथे कॉम्पुटरच्या निरनिराळया पार्टस पासून कितीतरी वस्तू बनवल्या होत्या. बिल्डींग्स, डोंगराच्या मधून वळणे घेत चालणाऱ्या ट्रेन, आणि बरेच काही.

अंधार पडायला सुरवात झाली. थंडगार वारे सुरु झाले. राधिकाला घेवून जास्त वेळ बाहेर थांबता येणे शक्य नव्हते. थोडा वेळ तिथे बागेमध्ये बसून चारीमुरी खाण्याचा आनंद आम्ही घेतलाच. बागेत जायचे आणि काही न खाताच तसेच वापस यायचे,

म्हणजे काय? खाताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली. पूर्ण बागेमध्ये कमालीची स्वच्छता होती. कुठेही कचरा, भेळेचे कागद, कागदाचे फेकलेले बोळे काहीही पडलेले दिसत नव्हते. ठिकठिकाणी कचरा टाकण्यासाठी डबे ठेवलेले होते. त्यातच लोक कचरा टाकीत. लहान मुले गवतावर खेळत होती. मोठी माणसेही हसणे, खिदळणे, गप्पा, खाणे एन्जॉय करत होती. पूर्ण बागेचा तो परिसर खूपच मोठा आणि तरी पण अतिशय स्वच्छ होता.

सॅनफ्रान्सिस्कोला जाण्यापूर्वीच रश्मीने नंतरच्या वीकएंडचे लेक टाहोचे रिसॉर्ट बुक करून ठेवले होते. तिथून चार तासांच्या अंतरावर असलेले हे एक निसर्गरम्य स्थळ. सकाळी दहा साडेदहा वाजता आम्ही लेक टाहोला जाण्यासाठी बाहेर पडलो. प्रवासात खाण्याचे काहीतरी बरोबर असावे म्हणून आम्ही सोबत इडली आणि चटणी घेतली होती. बाहेर पडले की ते नेहमीचेच प्रसन्न वातावरण आपले स्वागत करते आहे असे वाटायचे. आणि आता तर आम्ही खास पर्यटनालाच निघालो होतो. रस्त्याने जातानाच एक एक दृश्य नजरेस पडत  होते. एखाद्या खजिन्यातून एक एक किमती चीज बाहेर काढावी तसे हे निसर्ग सौंदर्य मनात भरत होते. एखाद्या अती रम्य, अती भव्य अशा प्रेक्षणीय स्थळाकडे आपण जात आहोत याचा प्रत्यय येत होता. रस्त्यात दिसणारे डोंगर, त्यावर पसरलेला तो पोपटी रंगाचा मऊ मऊ गालीचा आणि त्या फिकट पोपटी गालिच्यावर मधूनच नक्षी काढल्यासारखी गडद हिरव्या रंगाची ठेंगणी, ठुसकी, झुबकेदार झाडे. प्रत्येक हिरव्या रंगाची छटा वेगळी. आणि या सर्व हिरव्या रंगाच्या पार्श्वभूमीवर मधेच एखादे पिवळे झाड आपला तोरा मिरवताना दिसे. पुन्हा एकदम जांभळया आणि लाल रंगाची फुले दिसत. आपण हे सगळे डोळयात साठवतोय न साठवतोय तोच एकही पान नसलेले आणि पांढऱ्या रंगाच्या फुलांनी गच्च भरलेल्या अशा झाडांच्या रांगा मधून मधून सारख्या दिसायच्या. या सर्व गोष्टींकडे गोष्टींकडे मी डोळे फाडून बघायची.

चार तासांचा प्रवास होता त्यामुळे मध्ये थोडा आराम घेणे आवश्यक होते. सारंग एकटाच गाडी चालवत होता. आम्ही रस्त्यात एका ठिकाणी थांबलो. एका मेक्सिकन हॉटेलमध्ये चलुपा घेतला. मला तो पदार्थ आवडला. मध्ये वाफवलेल्या भाज्या आणि चीज घालून पुरीचा केलेला तो रोल असायचा. आपल्या भारतीय जेवणाशी थोडा मिळता जुळता


वाटायचा. रश्मी मला नेहमी म्हणायची, ‘हे काय गं आई तुझं? हे आवडत नाही, ते आवडत नाही, हे चालत नाही. कुठलाही व्हेज पदार्थ आणि कुठल्याही हॉटेलमध्ये गहू, तांदूळ, भाज्या या पासूनच तयार केलेला असतो ना? त्यात तेल किंवा तूप असणार. आणखी काय? न खाण्यासारखे आणि न आवडण्यासारखे काय आहे त्यात?’ यावर मी हसले की ती म्हणायची ,’ मला माहित आहे, तू का हसतेस ते.’ हीच रश्मी लहानपणी जेवण्यासाठी किती नखरे करायची, हे आवडत नाही, ते नको म्हणून किती रडायची हे मी तिला कधी कधी बोलून दाखवी, ते तिला आठवले असणार.



लेक टाहोच्या एरिया मध्ये प्रवेश करत असतानाच बर्फानी आच्छादलेले डोंगर आणि घरे यांनी आमचे प्रथम स्वागत केले. प्रत्येक घरावरचे छप्पर बर्फाचे आणि दारापुढे एवढा मोठा बर्फ साचलेला. आम्ही अशा वेळी आलो होतो की जेव्हा खूप अती बर्फ नव्हता आणि पूर्ण बर्फ वितळूनही गेला नव्हता. थोडेसे उन पडले की तो बर्फ वितळताना दिसे. आम्ही ज्या हॉटेलमध्ये उतरलो होतो तिथे पण आजूबाजूला आणि वर छपरावर थोडा बर्फ साचलेला होता. हॉटेलची रूम पॉश होती. त्यात किचनही होते. मायक्रोवेव्ह आणि क्रोकरीचा सेट होता. फोल्डिंगचा बेड होता आणि आणखी एक सोफा कम बेड होता. तो फोल्डिंगचा बेड पूर्ण भिंतीला उभा करून ठेवलेला होता. रूम बघूनच आम्ही खुश झालो. रुममध्ये प्रवेश करतानाच चॉकलेट, कुकीज, पेस्ट, शाम्पू या गोष्टी आम्हाला देण्यात आल्या होत्या. आम्ही ज्या हॉटेलमध्ये उतरलो होतो ते हॉटेल अगदी मध्यवर्ती ठिकाणी होते. तिथून सगळे जवळ होते. पायी जाण्यासारखे. दुपारी चार वाजता आम्ही तिथे पोंचलो. रूमवर जावून थोडे फ्रेश होवून आम्ही लेकवर गेलो. चारी बाजूना मोठे मोठे

पर्वत आणि आत एक मोठे जलाशय. असे हे लेक टाहो. ते पर्वतही साधे सुधे पर्वत नाहीत तर संपूर्ण बर्फाच्छादित . पांढरे शुभ्र.

राधिकाला तिच्या कारसीट मध्ये एकदम पॅक करून घेतले होते. कारण तिथे आजूबाजूच्या परिसरात पूर्ण बर्फच बर्फ होता. सिनेमात बर्फ बघितला होता पण एवढा बर्फ प्रत्यक्षात पहिल्यांदाच बघितला होता. काय करू अन काय नको असे झाले होते. मी बर्फ हातात घेतला, आम्ही बर्फावरून चाललो. सारंगने आणि मी आम्ही एकमेकांच्या अंगावर बर्फ टाकला. रश्मीच्या अंगावर बर्फ टाकायची सोय नव्हती कारण राधिका लहान होती आणि तिला सर्दी बाधेल ही भीती वाटत होती. तिथे खूपच गार वारा होता. राधिकाला कितीही पॅक केले असले तरीही तिला थंडी बाधेल ही भीती वाटत होती. त्यामुळे आम्ही तिथून निघालो. आणखी एक दोन व्ह्यू पॉइंट बघितले. प्रत्येक ठिकाणाहून वेगवेगळ्या कोनातून दिसणारे लेकचे दृश्य अप्रतिम होते. संध्याकाळ पण लौकरच होत होती. आम्ही रूमवर परत आलो. सोबत घेतलेली इडली चटणी होतीच. ती आम्ही आल्याबरोबर फ्रीजमध्ये ठेवली होती. मायक्रोवेव्ह मध्ये इडल्या गरम केल्या आणि पोटभर जेवण केले.



दुसरे दिवशी सकाळीच तयार होवून गंडोला राईडला निघालो. केबलवर चालणाऱ्या कारने पर्वताच्या एकदम टोकावर जायचे होते. दुरूनच तो पांढराशुभ्र पर्वत मोठा देखणा दिसत होता. तिथे जातांना मध्ये एका ठिकाणी उतरून तिथून पण काही दृश्ये बघता येत होती. आम्ही तिथे उतरलो. तिथे एक दुकान होते आणि तिथून आजूबाजूचे दृश्य बघता यावे म्हणून कठडे बनवले होते. तिथले दृश्य बघितल्यावर आम्ही वर

गेलो. पर्वताच्या उंचावरून बघतानाचे दृश्य मोठे विलोभनीय होते. सगळीकडे बर्फाचे डोंगर आणि मध्यभागी असलेले लेक, वरून अगदी स्पष्ट दिसत होते. त्याच्या आजूबाजूला असलेले ते छोटेसे शहर त्याची शोभा वाढवत होते. बर्फावर उन पडल्यामुळे ते चमकत होते. तिथे वर एक हॉटेलही होते. लोक खूप मजा करत होते. कुणी खात पीत बसले होते तर कुणी बर्फावर लोळत पडले होते. लहान मुलांची तर काय मजाच होती. बर्फावर घसरगुंडी खेळण्यात ती दंग होती. कुणी स्कीईंग करत होते. आत्तापर्यंत जे काही फक्त सिनेमातच बघितले होते आणि जे कल्पनेतही आपल्याला कधी बघायला मिळेल असे वाटले नव्हते ते सगळे प्रत्यक्ष डोळयांना दिसत होते. आपण स्वप्नात तर नाही ना याची खात्री करून घेतली. रश्मी आणि सारंगने केबल कारमध्ये आणि वर गेल्यावर सगळीकडे भरपूर फोटो आणि व्हिडीओज घेतले. तिथेच आम्ही थोडेसे खाल्ले. राधिकाला घेवून जास्त फिरणे शक्य नव्हते. आम्ही रूमवर आलो. बाहेर सगळीकडे फिरताना राधिका मस्त झोपायची आणि रूमवर आलो की खूप खेळायची. जणू काही ही सगळी एन्जॉयमेंट तिला पण कळत होती.

राधिकाची आणखी एक गम्मत होती. तिथे घरी सिलिंग पंखा नव्हता. आम्ही ज्या रूममध्ये थांबलो तिथे वर पंखा होता. पलंगावर टाकले की तो वर अगदी समोर दिसायचा. पंखा लावला की ती त्याच्याकडेच बघत रहायची आणि जोरजोरात हातपाय हलवून खेळायची. मग आम्हाला तो नादच लागला. थोडावेळ पंखा लावायचा, त्याला गती आली की तो बंद करायचा. आम्ही तिघेही आळीपाळीने ते काम करत होतो. तिने खेळायला सुरवात केली आणि त्याची गती मंद झाली की तो पुन्हा चालू करायचा. कारण तिथे एवढ्या थंडीत पंखा सतत चालू ठेवणे शक्य नव्हते. राधिकाचे तसे खेळतानाचे आणि एकटक पंख्याकडे बघतानाचे कितीतरी फोटो आणि व्हिडीओ घेतले.

दुपारी एका मेक्सिकन हॉटेलमध्ये बरिटो खाल्ला. बरिटो म्हणजे चलुपा सारखाच पण पुरीऐवजी पोळीमध्ये तो सगळा मसाला भरलेला. नंतर स्टारबक्स मध्ये कॉफी घेतली. तिथला चाय-टी-लाटे हा प्रकार मला खूप आवडायचा.

दुपारी थोडासा आराम करून संध्याकाळी पुन्हा जवळच एक वॉटर फॉल होता तो बघायला गेलो. बर्फाच्या पर्वतामधून घाटाचा रस्ता होता. सारंग एकटाच ड्राईव्ह करत होता. रश्मी अजून ड्रायव्हिंग शिकली नव्हती. मी तिला म्हणाले की मी पुढच्या वेळेस

येईन तेव्हा तुला ड्रायव्हिंग आले पाहिजे. म्हणजे कुठे गेलो तर एकट्या सारंगवर ताण पडणार नाही. त्या पर्वताच्या रांगांमधून जाताना पण असेच निरनिराळे व्ह्यू पॉइंटस दिसत होते. लोक बाजूला गाडी घेवून तिथे उतरून बघत होते. अगदी साध्या साध्या गोष्टीना पण काहीतरी विशिष्ट नाव देवून त्याला कसे उचलून धरावे आणि लोकांपुढे ते कसे प्रदर्शित करावे ते या लोकांकडून शिकायला पाहिजे. प्रत्येक पॉइंटला काहीतरी नाव दिलेले असे. प्रत्येक ठिकाणी पार्किंगला जागा असायची, बसण्यासाठी काही बेंचेस असायचे. आम्ही पण काही पॉइंटस खाली उतरून बघितले, काही गाडीतूनच बघितले. कारण प्रत्येक वेळेला राधिकाला घेवून उतरणे शक्य नव्हते. बघत बघत आम्ही बरेच पुढे गेलो तो पूर्ण ट्राफिक जाम. असे कळले की आम्ही जो वॉटर फॉल बघायला जाणार होतो त्या रस्त्यावर कुठे तरी बर्फाचा कडा कोसळून रस्ता जाम झाला होता. तो बर्फ काढण्यासाठी गाड्या मागवल्या होत्या. बर्फ बाजूला करण्याच्या त्या गाड्या वेगळया असतात. त्यांच्या चाकांना मोठमोठ्या साखळया असतात. आणि त्याद्वारे बर्फ बाजूला करण्यात येतो. नुकताच जमा झालेला बर्फ बाजूला करायला सोपा जातो पण एकदा का तो घट्ट झाला की मग अवघड जातो. पोलिसांच्या गाड्या पण आलेल्या होत्या. तिथे 'हेल्प' हा प्रकार फार उत्तम आहे. एवढा आडवळणाचा रस्ता पण जागजागी टेलिफोनच्या लाईन्स आणि जागजागी सूचना होत्या. 'मदतीसाठी या नंबरवर कॉल करा', 'ड्रायव्हर पिलेला असेल तर या नंबरवर कॉल करा' अशा सूचना होत्या. याशिवाय आणखी इतरही सूचना असत. म्हणजे, हॉटेल, पेट्रोल पंप, हॉस्पिटल, रेस्टरूम इ. तुम्हाला कुठे जायचे आहे त्याप्रमाणे त्या सूचना बघून जाता येते. जी.पी.एस. हा प्रकार सारंगने अद्याप घेतला नव्हता पण तो घेणे किती आवश्यक आहे हे आम्हाला सॅनफ्रान्सिस्कोच्या ट्रीपमध्ये कळले होते.

रस्ता जाम झाल्यामुळे तो धबधबा न बघताच आम्ही रूमवर वापस आलो. आम्ही जिथे उतरलो होतो तिथे कसीनो खूपच जवळ होता. म्हणजे रोडच्या एका बाजूला आमचे हॉटेल आणि थोडे पुढे गेलो आणि रोड क्रॉस केला की दुसऱ्या बाजूला कसीनो. कॅलिफोर्नियाच्या बॉर्डरच्या एका बाजूला नेवाडा स्टेटची हद्द सुरु होत होती आणि नेवाडामध्ये कसीनो खेळावर बंदी नव्हती. मला कसीनो दाखवायची रश्मीची खूप इच्छा होती. आम्ही तिथे गेलो. मला खरे तर भीतीच वाटत होती. कारण हे कसीनो, जुगार वगैरे

सगळे सिनेमात बघितले होते. तिथे खून, मारामाऱ्या होतात असा पण एक समज होता. सिनेमात जे काही बघितले होते ते काही फार सुखकारक नव्हते. तिथे जाणे म्हणजे आपल्या सारख्यांना, त्यातल्या त्यात बायकांना काही बरे नव्हे असे वाटायचे. बायकांना जाणे तर वर्ज्यच. हे असे काही चित्र माझ्या डोळयासमोर होते. पण रश्मी मला म्हणाली, 'तू चल तर खरं . तिथे गेल्यावर तुला कळेल कसे असते ते. तू फक्त बघ. काही खेळू वगैरे नकोस.'

आम्ही आतमध्ये पाउल टाकले तो काय..! एका मोठ्या हॉल मध्ये हजारोनी वेगवेगळया खेळांच्या मशीन्स. प्रत्येक मशीनवर कुणीतरी बसून खेळण्यात मग्न. बायका आणि मुली तर खूपच होत्या. बायकांना तल्लीन होवून खेळतांना बघून वेगळेच वाटत होते. त्यांना बघून माझ्या डोळयासमोर आपल्या इकडच्या गरीब, बिचाऱ्या बायका येत होत्या. तिथे सोळा वर्षाखालील मुलांना प्रवेश नसतो. पण राधिकासारखी अगदीच लहान मुले, किंवा तीन चार वर्षापर्यंतची मुले, जी आई वडिलांशिवाय राहू शकत नाहीत त्यांना आत प्रवेश मिळतो. त्यांना जवळ घेवून खेळण्याची परवानगी नसते. अशा लोकांसाठी एका बाजूला बसण्याची व्यवस्था केलेली असते. सारंग राधिकाला घेवून तिथे बसला. त्याच हॉलमध्ये एका बाजूला एक छोटेसे हॉटेल होते. लोक तिथेच खात, पीत, गप्पा मारीत बसत. काही सुंदर मुली तोकडे कपडे घालून आणि एका ट्रे मध्ये दारूचे ग्लास घेवून फिरत होत्या. प्रत्येकाच्या जवळ जावून त्या सर्व्ह करायच्या. ती दारू फुकट असायची. एका कोपऱ्यात एक छोटेसे स्टेज होते. तिथे बँड वाजत होता आणि एकजण मोठ्या आवाजात कोणतेतरी इंग्लिश गाणे म्हणत होता. ते गाणे ऐकण्यासाठी काही लोक समोर खुर्च्या टाकून बसले होते.



रश्मीने एका मशीनसमोर बसून कसे खेळायचे ते मला दाखवले. तिला एका डॉलरवर बेचाळीस डॉलर मिळाले. तिने पुन्हा ते बेचाळीस डॉलर लावले आणि सगळे हरले. मला गम्मत वाटू लागली. तिने मला पण एक डॉलर दिला आणि खेळून बघ म्हणाली. मी तो एक डॉलर लावला आणि मला तेवीस डॉलर मिळाले. मी खेळ संपवून उठू लागले पण रश्मीने आग्रह केला म्हणून पुन्हा बसले. पुन्हा पैसे लावले आणि ते सर्व तेवीस डॉलर हरून बसले. एवढे पैसे हरत असताना माझा जीव थोडा थोडा होत होता. आम्ही दोघी मिळून ऐंशी डॉलर हरलो होतो. मी रश्मीला म्हणत होते, 'नको गं बाई, हे असले काही.' तर ती म्हणाली, 'अगं आई, आपल्याला काही हे व्यसन थोडेच आहे? आपण काय रोज येवून आपले सगळे पैसे इथे लावणार आहोत का ? आणि हे असे खेळणे सगळीकडे चालत नाही. फक्त काही ठिकाणीच खेळायला परवानगी आहे. याच्यापेक्षा लॉसवेगासचा कसीनो बघशील तर तू काय म्हणशील की! सहज एक मजा म्हणून आपण इथे आलो आहोत. घरी नाही का आपण पत्ते खेळतो आणि आपल्या काही छोट्या छोट्या वस्तू हरतो, तसेच.' पण मला तिथे जास्त वेळ बसवले नाही. पैसे हरल्यामुळे रश्मीही नाराज झाली होती. सारंग राधिकाला घेवून बसला होता, तिथे आम्ही आलो. रश्मीचा एवढासा चेहरा बघून सारंगने ओळखले की ती पैसे हरली आहे. ऐंशी डॉलर हरल्याचे सांगितल्यावर तो म्हणाला,

'अजून वीस डॉलर माझ्याकडून घे आणि खेळ. आज तुला माझ्याकडून वाढदिवसाबद्दल शंभर डॉलर गिफ्ट समज. तू हरलीस तरी मी काही म्हणणार नाही.'

त्या दिवशी पंधरा मार्च. रश्मीचा वाढदिवस होता. मी म्हणाले,

'आता मी राधिकाला घेवून बसते, तुम्ही दोघे जावून खेळून या.'

मी राधिकाला घेवून तिथे बसले. ती छान खेळत होती. सगळीकडे रंगीबेरंगी लाईटचा झगमगाट होता. शिवाय संगीतही चालू होते. येणारे जाणारे लोक तिच्याकडे बघून हाय, हेलो करीत आणि माझ्याकडे बघून स्माईल देत. दारू सर्व्ह करणाऱ्या मुली माझ्याकडे वेगळयाच नजरेने बघत होत्या. (असे कदाचित मला वाटत असेल) आजूबाजूची लहान मुले

पण मधेच येवून राधिका बरोबर खेळत. थोडावेळ खेळून राधिका झोपली. मी आपले ते सगळे आजूबाजूचे बघत बसले.

काही वेळानंतर सारंग आणि रश्मी वापस आले. रश्मीचा खुललेला चेहरा बघूनच मी ओळखले की ती नक्कीच जिंकली असणार म्हणून. माझा अंदाज खरा ठरला. ती एकूण एकशे तीस डॉलर जिंकली होती. म्हणजे हरलेले ऐंशी डॉलर सोडले तरी पन्नास डॉलरचा फायदा झाला होता. तिथेच एक ए.टी.एम. मशीन असते किंवा कॅशियर पण बसलेला असतो. आपण जेवढे पैसे जिंकले तेवढ्याचे एक तिकीट आपल्याला मिळालेले असते. त्या तिकिटावर आपण ए.टी.एम. मधून किंवा कॅशियर कडे जावून पैसे घेवू शकतो.




रश्मी आणि सारंग जावून पैसे घेवून आले. एकंदरीत तिचा वाढदिवस तर छान साजरा झाला होता. पैसे जिंकल्यामुळे त्या खुषीत आणखी भर पडली होती. मग मात्र आम्ही जास्त वेळ तिथे थांबलो नाही. तिथल्याच हॉटेलमधून पिझ्झा आणि ब्रेड घेतला. रूमवर मायक्रोवेव्ह होताच, क्रोकरीही होती. रश्मीने मॅगीची दोन पाकिटे बरोबर घेतली होती. मॅगी बनवली आणि मग एक मस्तपैकी इंग्लिश पिक्चर बघत आम्ही ताणून दिली.

दुसरे दिवशी मात्र भारतीय जेवण घ्यायचे ठरवले. कारण आम्ही, म्हणजे जास्त करून मीच, ह्या अशा वेगळया प्रकारच्या खाण्याला कंटाळलो होतो. एका भारतीय

हॉटेलमध्ये जावून आम्ही दालफ्राय, राईस, पराठा, भाजी असे जेवण केले आणि वापस येण्यासाठी निघालो. त्या हॉटेलमध्ये पंजाबी बाई होती आणि आमच्याशी बोलतांना (कदाचित माझ्याकडे बघून असेल ) ती चक्क हिंदीमधून बोलत होती.

जेव्हा लेक टाहोला येण्यासाठी रश्मीने रिसॉर्ट बुक केले होते तेव्हा तिथले त्या दिवशीचे हवामान बघितले होते. त्यात दोन दिवस ढगाळ आणि किंचित पावसाची, शिवाय बर्फ पडण्याची शक्यता दाखवली होती. पण दोन दिवस बऱ्यापैकी उन पडले होते. रात्री थोडासा पाऊस पडला होता. आता आम्ही निघतेवेळी मात्र आभाळ भरून आले होते. पण बर्फ पडताना बघण्याची आमची इच्छा मात्र अपूर्ण राहिली. येतानाचे रस्त्यातले दृश्य पुन्हा तसेच. विहंगम. आता तर त्यात पाळणाऱ्या ढगांची भर पडली होती. सगळ्या डोंगरावरून ढग पळत होते. मधेच एका ठिकाणी छोटासा धबधबा बघायला मिळाला. आमची कालची मोठा धबधबा बघण्याची इच्छा त्या लहान धबधब्याने पूर्ण केली. आम्ही रस्त्यावर खाली उतरून त्या ढगांमधून चालून बघितले. ढगांचे आणि त्या ढगाळ वातावरणातले खूप फोटो काढले. येतानाही त्याच निसर्ग सौंदर्याचा आस्वाद घेत आम्ही परत आलो.

लेक टाहोला जावून आल्यानंतर आमचे फोटो आम्ही इकडे निलू आणि नमाला पाठवले. तेव्हा गिरीषने कॉमेंट केलीच. त्यांच्या मते मां, म्हणजे मी, एवढ्या लहान बाळाला राधिकाला, बर्फात कसे काय नेले आणि वर बर्फामध्ये काढलेले फोटो सगळ्यांना पाठवले. इकडे असत्या तर त्यांनी चार महिने बाळाला गार वाऱ्यात पण नेवू दिले नसते. अर्थात ते त्यांचे मला चिडवणे होते हे मला कळले. कारण राधिकाचा जन्मच मुळात अमेरिकेत झाला त्यामुळे तिथले वातावरण तिला बाधले नसते, हे त्यांना माहित होते. आणि खरेच राधिकाला त्या तेवढ्या थंडीचा पण काही त्रास झाला नाही.

माझी भारतात वापस येण्याची तारीख जवळ जवळ येत चालली होती. आणखी काय काय बघायचे राहिले आहे, मला काय दाखवता येणे शक्य आहे याचा रश्मी आणि सारंग विचार करत होती. जवळच 'सेव्हंटीन माईल्स' म्हणून एक ड्राईव्ह होता. म्हणजे सतरा मैलांचा प्रवास पूर्ण समुद्र किनाऱ्याच्या काठाने. तिथे जायचे ठरले. त्याप्रमाणे

एका शनिवारी सकाळी 'सेव्हंटीन माईल्स' बघायला आम्ही निघालो. जाताना एका चायनीज हॉटेलमध्ये थाई डिश घेतली. तो भात खूपच टेस्टी होता.

त्या दिवसात कुठेही बाहेर पडले की वातावरण खूपच आल्हाददायक असते. तो पूर्ण सतरा मैलांचा रस्ता डोंगरामधून जात होता. दुसऱ्या बाजूला प्रशांत महासागराचा



किनारा. तिथे पण वेगवेगळे व्ह्यू पॉइंटस होते. अगदी वरपर्यंत डोंगरावरून समुद्र कसा दिसतो, एका विशिष्ट ठिकाणावरून कसा दिसतो आणि अशा ठिकाणांची वेगवेगळी नावे. एका पॉइंटला 'लोन सायप्रस' असे नाव होते. तिथे सायप्रसचे एकच झाड असे दूरवर समुद्रात होते. त्या झाडाला चांगला दगडाचा पार बांधून त्याला शो पीस बनवले होते. 'घोस्ट पॉइंट' म्हणून एक ठिकाण होते. तिथे काही वाळलेली झाडे अगदी वेड्या वाकड्या आकारात वाढलेली होती. ती पांढरी शुभ्र झाडे भुतासारखी दिसत होती म्हणून घोस्ट पॉइंट. एक बर्ड रॉक होता. तिथे खूप सारे पक्षी एका मोठ्या खडकावर बसलेले असायचे. तो खडक समुद्रात होता. तिथे समुद्रसिंहाचे .. सी लायनचे आवाज ऐकायला यायचे. खरे तर या असल्या सगळ्या दृश्यांची आपल्या भारतातही कुठे कमी नाही पण त्याचे एवढे स्तोम माजवणे

आपल्याला जमत नाही. त्यामुळे अशी दृश्ये कुठे आहेत, काय काय आहेत ते पण जास्त लोकांना माहित नसते. तरी आता आपल्या देशातही लोक पर्यटनाचा आनंद लुटायला लागले आहेत. हे सगळे बघत असताना मला आपल्याकडील कोकण, केरळ आणि काश्मीर पण या पेक्षा काही कमी नाही याची सतत जाणीव होत होती. उलट आपल्याकडच्या सारखी शिल्पकला इतरत्र कुठे दिसायची नाही. थोडावेळ एका ठिकाणी समुद्राच्या पांढऱ्याशुभ्र, मऊ, बारीक रेतीवर बसून आम्ही परत निघालो. समुद्राच्या दर्शनाने मन प्रसन्न झाले होते.

निघण्याची तयारी सुरु झाली. खरेदी करणे चालू होते. कुणासाठी काय काय न्यायचे त्याचा विचार चालू होता. एक तर वस्तू वजनाने हलकी असावी शिवाय आपल्या बजेटमध्ये बसणारी असावी असे वाटायचे. काहीही बघितले तरी कमीतकमी पाच डॉलर लागायचे. मग माझा मनातल्या मनात हिशोब चालू व्हायचा. पाच डॉलर म्हणजे अडीचशे रुपये. तेवढ्या पैशात भारतात कितीतरी चांगल्या वस्तू मिळतील असे वाटायचे. एवढे पैसे जायचे आणि वस्तू साधीच वाटायची. विचार करण्यात बराच वेळ जायचा. रश्मी रोज इंटरनेटवर शॉपिंग मध्ये जावून मला काय काय दाखवायची. ते सगळे बघायला बरे वाटायचे. तिचे म्हणणे असे की आपण घरी बसून सगळे बघायचे, पसंद करायचे आणि मग फक्त दुकानात जावून घ्यायचे.

एकीकडे ही तयारी तर दुसरीकडे सारंग-रश्मीचे मित्र मैत्रिणी यांच्याकडे जेवायला बोलवणे चालू होते. आनंद-अमृता, रूपा (आमच्या विडूळचीच एक मुलगी, निलूची मैत्रीण तिथेच होती.), ज्योती (आमच्या अनुची चुलत नणंद), अनुराधा ( अनघाची चुलत नणंद जिच्या लेटेस्ट डिलिव्हरीबद्दल आमचे औरंगाबादला बोलणे झाले होते) या सगळयांच्या कडे एक एक दिवस जेवायला जाणे झाले.

आम्ही रोज बाहेर फिरायला जात होतो. बाहेरच जेवण, खरेदी असे चालायचे. तेथील एक एक दुकाने बघून तर माझे डोकेच चक्राऊन जायचे. पण एका गोष्टीची मला नेहमी खंत वाटायची. तिथे सगळयाच देशातील दुकाने आणि हॉटेल्स असायची. त्या त्या दुकानाचे नाव आधी इंग्लिशमध्ये लिहिलेले असायचे आणि त्याखालीच त्यांच्या मूळ

भाषेतही ते नाव लिहिलेले असायचे. म्हणजे चीनी, मेक्सिकन, जापनीज, स्पॅनीश इ. पण आपल्या कोणत्याही भारतीय हॉटेलवर इंग्लिशच्या खाली हिंदीमध्ये नाव लिहिलेले दिसले नाही. ही गोष्ट मी सारंगलाही बोलून दाखवली, त्यालाही माझा मुद्दा बरोबर वाटला. पण आम्ही काय करू शकत होतो?

आता फक्त एकच शनिवार राहिला होता. एकोणतीस मार्चला रविवारी सकाळी पाच वाजता मला निघायचे होते. जशी गेले होते तशीच वापस येणार होते. सॅनफ्रान्सिस्कोहून अटलांटा आणि तिथून रात्री आठ वाजता मुंबईची फ्लाईट. तीस मार्चला रात्री दहा वाजता मी मुंबईला पोंचणार होते. अमेरिकेला जाताना मी सहा तारखेला निघून सहा तारखेलाच पोंचले होते. आता येताना मात्र मी एकोणतीसला सकाळी निघून तीसला रात्री दहाला पोंचणार होते.

मला एखादा सिनेमा दाखवावा असे रश्मीच्या मनात होते. माझ्या मनात वेगळेच विचार चालू असत. मला वाटायचे की आपण कुठेही गेलो तरी तिथल्या देवदर्शनाला जातो. आपल्याकडे तर कुठल्याही पर्यटन स्थळी जा, तिथे एखादे प्रसिध्द मंदिर असतेच. आपण अमेरिकेमध्ये आलो, एवढे दिवस राहिलो, एखाद्या चर्चमध्ये जायला काय हरकत आहे? आपल्याकडचे चर्च बघितले होते पण तिकडचे चर्च बघणे हा एक वेगळा अनुभव आपल्याला घेता येईल. मी माझी इच्छा सारंगला बोलून दाखवली. सारंग विचार करत होता, की तिथून जवळच स्टॅनफोर्ड युनिव्हर्सिटी आहे ती बघायला जावे. तिथे एक मोठे चर्च आहे. युनिव्हर्सिटी आणि चर्च दोन्हीही बघता येईल. पण आता आमच्याजवळ वेळ कमी होता. सिनेमा आणि युनिव्हर्सिटी दोन्ही बघायचे होते.

शनिवारी एका दिवसात सगळे करायचे आम्ही ठरवले. शुक्रवारी रश्मीने सहजच माझ्या फ्लाईटची पोझिशन इन्टरनेटवर बघितली. मी एकोणतीसला सकाळी घरून निघून अटलांटाला पोंचणार होते आणि अटलांटाहून रात्री आठ वाजता माझी मुंबईची फ्लाईट होती. पण इंटरनेटवर माझी ती फ्लाईट एकोणतीसच्या ऐवजी तीसला रात्री दाखवली होती आणि एकोणतीसला कोणतीही फ्लाईट जाणार नव्हती असे दाखवले. माझ्या जवळ तिकिटाचे जे प्रिंट आउट होते त्याप्रमाणे मी अटलांटाहून एकोणतीसला रात्री निघणार

होते. तो घोळ काय आहे ते आम्हाला कळेना. म्हणजे मी जर एकोणतीसला अटलांटाला दुपारी पोंचले आणि तीसला रात्री जर माझी फ्लाईट असेल तर एकोणतीसचा अर्धा दिवस आणि तीसचा पूर्ण दिवस रात्री आठ वाजेपर्यंत मी तिथे काय करणार होते? ते पण आधीच समजले म्हणून, वेळेवर मी अटलांटाला गेल्यावर समजले असते तर मी काय केले असते. किती घाबरून आणि गोंधळून गेले असते. सारंग ऑफिसमधून आल्यावर त्याला हे सगळे सांगितले. त्यानेही इंटरनेटवर सगळे नीट बघितले आणि त्या कंपनीला फोन केला. त्यांनी सांगितले की एकोणतीसची फ्लाईट कॅन्सल झाली म्हणून त्यांनी मला तीसच्या फ्लाईटमध्ये दाखवले. हे सगळे कळवण्यासाठी त्यांच्याकडे माझा काँटॅक्ट नंबर नव्हता. सारंगने फोनवर त्यांची खूप खरडपट्टी काढली. त्यानंतर त्या लोकांनी माझे सॅनफ्रान्सिस्कोचे एकोणतीसचे फ्लाईट तीसला सकाळी करून दिले. म्हणजे तीस तारखेलाच सकाळी घरून निघायचे आणि तीसलाच रात्री मुंबईची फ्लाईट पकडायची. त्यामुळे आम्हाला पुन्हा एक दिवस जास्त मिळाला.

एकाच दिवसात करावयाचे दोन कार्यक्रम आता आम्ही दोन दिवसात आरामात करायचे ठरवले. शनिवारी दुपारी एका मॉलमध्ये गेलो. तिथे 'मॉन्सटर व्हर्सेस अलाइन्स' हा लहान मुलांचा ३डी पिक्चर बघितला. मी आणि रश्मी सिनेमाला गेलो, सारंग राधिकाला घेवून बसला. ३डी सिनेमा मी पहिल्यांदा तिथेच बघितला.

दुसरा दिवस आम्हाला बोनस म्हणून मिळाला होता. सकाळी सर्व आटोपून पहिल्यांदा आम्ही 'कोकीळाज किचन' म्हणून तिथे एक प्रसिध्द भारतीय हॉटेल आहे तिथे गेलो. तिथे छानपैकी जेवण केले. जेवण खूपच मस्त होते. तिथून मग आम्ही स्टॅनफोर्ड युनिव्हर्सिटीकडे निघालो. कॅलिफोर्निया मधील पालोआल्टो इथे सॅनफ्रान्सिस्कोला जाताना स्टॅनफोर्ड ही जगप्रसिध्द युनिव्हर्सिटी आहे. थोडक्यात सिलिकॉन व्हॅलीचे हे हार्टच आहे. जगातील सगळयात उत्तम अशी ती एक संशोधन आणि शिक्षण संस्था आहे. तिथे प्रवेश मिळणे म्हणजे जगभरातील विद्यार्थी आपले भाग्य समजतात.

लिलॅड आणि जेन स्टॅनफोर्ड या दांपत्याने आपल्या मुलाच्या स्मरणार्थ १८९१ मध्ये या युनिव्हर्सिटीची स्थापना केली. मानवी जीवनात सुधारणा होण्यासाठी शिक्षणाचे महत्व पटविण्यासाठी आणि मानवतेचा प्रभाव वाढविण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले.

या युनिव्हर्सिटीला भेट देण्यासाठी दरवर्षी किमान एक लाख पन्नास हजार लोक येतात.

तिथे एक खूप मोठे म्युझियम आहे. त्यात युरोपियन संस्कृतीतील खूप शिल्पे आहेत. रॉडीन  या एकाच शिल्पकाराच्या तिथे जवळ जवळ दोनशे कलाकृती आहेत. प्रवेशद्वाराजवळच 'द गेट्स ऑफ हेवन' हे त्याचे प्रसिध्द शिल्प आहे. स्वर्गात किंवा नरकात गेल्यानंतर माणसाला कोणकोणत्या गोष्टींचा सामना करावा लागतो ते निरनिराळया कलाकृतींच्या द्वारे दाखवले आहे. या शिल्पांचा कालावधी १८८० ते १९०० असा आहे. तसेच तिथेच असलेल्या बागेत 'बर्घरस ऑफ कॅलेईस' या नावाचे शिल्प आहे. त्यात ब्राँझचे चार मानवी पुतळे आहेत. आणि त्यांच्या चेहऱ्यावर वेगवेगळया प्रकारचे भाव दाखवले आहेत. या शिल्पाचा काळ १८८४ ते १८९५ असा आहे. ही सर्व शिल्पे बहुत करून ब्राँझ, प्लास्टर आणि टेराकोटा पासून बनवलेली आहेत.

म्युझियमची इमारत तीन मजली असून इतर देशातील ऐतिहासिक शिल्पे पण आहेत. एशियन देशातील कलाकृतींमध्ये चीनचा प्रभाव जास्त दिसत होता. गौतम बुद्धाचे पुतळे खूप होते पण ते चीनच्या वतीने प्रदर्शित करण्यात आले होते. कारण बौध्द धर्माचा प्रचार भारतापेक्षा चीनमध्ये फार मोठ्या प्रमाणात झाला होता. भारतीय संस्कृतीतील फक्त श्रीकृष्णाची मूर्ती तिथे दिसली.



स्टॅनफोर्ड मधेच एक भले मोठे चर्च आहे. तिथे आम्ही गेलो. चर्चमध्ये खूप शांतता होती. कोणतीही पवित्र जागा असो, आपलेही मन तिथे शांत होतेच. तिथे काही आपल्यासारखे दर्शन घ्यायचे नसले तरी आपले हात मात्र अपोआप जुळले जातात. मध्यभागी एक खूप मोठे असे स्टेज होते. हॉलमध्ये बसण्याची व्यवस्था होती. मिसेस स्टॅनफोर्डने आपल्या पतीच्या स्मरणार्थ १९०३ मध्ये हे चर्च बांधले.

हे सर्व बघून संध्याकाळी आम्ही घरी परत आलो.

दुसरे दिवशी सकाळी पाच वाजताच आम्ही सॅनफ्रान्सिस्कोला निघालो. रश्मीने मला जेवण्यासाठी सोबत पुलाव करून दिला होता. पुन्हा तोच परतीचा प्रवास. पण दोन्ही वेळेसच्या प्रवासात किती फरक होता. मुलांना, विशेषतः राधिकाला सोडून येतांना अंत:करण खूप जड झाले होते. जसजसे इकडे येण्याचे दिवस जवळ येत चालले होते, तसतसे रश्मीच्या आणि माझ्या डोळयांना खंड नव्हता. सारखे रडायला येत होते. आता पुन्हा भेटीचा योग कधी येईल असे वाटायचे. राधिका तर खूपच लहान होती. सॅन्फ्रान्सिस्कोला माझे चेक इन झाले, आणि ती दोघे परत गेली.

येतांना सुध्दा सॅनफ्रान्सिस्को ते अटलांटा या प्रवासाची सीट मी खिडकीजवळच घेतली. तोच ढगांचा देखावा, वरून दिसणारी छोटी छोटी घरे, पर्वत, रस्ते, रस्त्यावरून पाळणाऱ्या त्या खेळण्यातल्या सारख्या गाड्या, हिरवीगार झाडे... साडे चार ते पाच तास माझी नजर खिडकीला खिळून राहिली होती. यावेळी मला आणखी एक गम्मत दिसली. काही विमाने क्रॉस झालेली दिसली. माझ्या मनात विचार आला, माणसाला पण असेच हवेत उडता आले असते तर? आपले ट्रॅफिक जामचे कितीतरी प्रॉब्लेम निकालात निघाले असते. वाहनांचा, पेट्रोलचा खर्च वाचला असता आणि शिवाय वेळेची पण बचत झाली असती. असे हवेतून जातांना जर कुणी ओळखीचे भेटले तर? मधेच कुठेही थांबून आपण त्याला बोलू शकू का?

अटलांटाला उतरल्यावर मी अगदी सराईतपणे त्या ट्रेनमधून डोमेस्टिक एयरपोर्टवरून इंटरनॅशनल एयरपोर्टवर गेले. या वेळी कुणाला काही विचारायचे काम पडले नाही आणि त्या फिरत्या जिन्याची पण भीती वाटली नाही. रात्री आठ वाजता माझी डीएल १८५ ही फ्लाईट मुंबईकडे निघाली. प्रवास पूर्ण रात्रीचा होता. नकाशावर सर्व काही दिसत होते. मुंबई जसजसे जवळ येत होते तसतसे मन भरून येत होते. राहून राहून एक विचार सारखा मनात येत होता, दुसऱ्याचे कितीही, काहीही चांगले असले तरी शेवटी आपले ते

आपलेच. आपली मातृभूमी आपल्याला किती प्रिय आहे. अगदी आईच्या कुशीत शिरल्यासारखे वाटत होते. मनात सावरकरांच्या ओळी घुमत होत्या.

'ने मजसी ने परत मातृभूमीला

सागरा प्राण तळमळला ... तळमळला'

रात्री बरोबर दहा वाजता मी मुंबईला पाउल टाकले. सामान घेतांना काही सुध्दा त्रास झाला नाही. उतरल्याबरोबर माझा मोबाईल पण चालू झाला. गिरीषला फोन केला. ते मला घेण्यासाठी गाडी घेवून आले होते. रात्रीची वेळ होती तरीही रस्त्यात नेहमीप्रमाणेच ट्रॅफिक जाम झाली होती. बाहेर गाडी काढायलाच कितीतरी वेळ लागला. रस्त्यात नेहमीप्रमाणेच गजबजाट होता आणि उकाडा सुरु झाला होता. मी एवढा प्रवास करून थकून भागून आले होते, तरी पण मला ते सर्व हवेहवेसे वाटत होते.

# ई साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठान ही काही व्यावसायिक प्रकाशन संस्था नाही. काही सामाजिक ध्येय डोळ्यांसमोर ठेवून मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती यांच्यासाठी ही तरुणांची संस्था काम करते आहे. सध्या ई साहित्य प्रतिष्ठानचे सव्वा दोन लाख वाचक आहेत.

ई साहित्य प्रतिष्ठानच्या पुस्तक खजिन्यात सातत्याने नवनवीन भर पडत असते. २०१४ मध्ये सुमारे शंभर ई पुस्तके आम्ही प्रकाशित केली, २०१५ मध्ये सव्वाशे. २०१६ मध्ये नवीन खूप सारी पुस्तकं लवकरच येत आहेत. एकाहून एक भारी. ही सर्व पुस्तकं सर्वच्यासर्व साडेतीन लाख वाचकांना देण्याचा आटोकाट प्रयत्न केला जातो. पण प्रत्येक वेळी ते जमतेच असे नाही. अनेक वाचकांपर्यंत काही पुस्तके पोहोचत नाहीत. पण VIP सदस्यांना मात्र सर्व पुस्तके नक्की दिली जातात. तुम्हाला सर्वच्या सर्व पुस्तके हवी असतील तर VIP सभासद बना.

VIP सभासद बनणं अगदी सोप्पं आहे. आपल्या ओळखीच्या दहा लोकांचे मेल आय डी कळवा आणि बना VIP सभासद.

संपर्क साधा : esahity@gmail.com

ही सेवा पूर्णपणे निःशुल्क आहे. त्यामुळे आपले मित्र आपल्यावर खुश होतील. शिवाय आम्ही ही खात्री देतो की या ई मेल्सचा वापर फ़क्त आणि फ़क्त मराठी साहित्य पाठवण्यासाठीच केला जाईल. इतर कसल्याही जाहिराती पाठवून त्यांना त्रास दिला जाणार

नाही. तेव्हा लवकरात लवकर आपल्या माहितीतल्या दहा किंवा अधिक मराठी साक्षरांचे ई मेल पत्ते आम्हाला द्या.

www.esahity.com या वेबसाईटला भेट द्या.

आपल्या पत्राची वाट पहात आहोत.

धन्यवाद

आपले नम्र

टीम ई साहित्य प्रतिष्ठान

